महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

**अतितात्काळ :**
**कालमर्यादा :दिनांक ०७ एप्रिल, २०२२**

जा.क्र.तंशिविकापु/विवि/स्प्रिंगबोर्ड/२०२२/ 1632
दिनांक 05 APR 2022

प्रति,
संचालक / प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखालील
सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था
(पुणे विभाग पुणे)

**विषय : Springboard Infosys साठी संस्थेने Single Point of Contact (SPOC) ई-मेल आयडी माहिती पाठविणेबाबत...**
संदर्भ :- तंत्रशिक्षण संचालनालयाचा दिनाक ०४ एप्रिल, २०२२ रोजीचा ई-मेल संदेश.

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय ई-मेल संदेशास अनुसरुन आपणास सूचित करण्यात येते की, Infosys कंपनी सोबत करण्यात आलेला त्री-पक्षीय सामजस्य (MOU) कराराच्या अनुषंगाने उच्च व तंत्रशिक्षण विभाग Infosys कपनी यांच्यासमवेत दि. ३० नोव्हेंबर २०२१ रोजी मंत्रालयातील मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण महोदयांच्या ५ वा मजला मुख्य इमारत येथील दालन क्रमांक ५०१ येथे संपन्न झालेल्या बैठकीत Infosys कंपनीच्या Springboard या ऑनलाईन मंच (Platform) वर उपलब्ध असलेल्या नि:शुल्क ऑनलाईन कोर्सेसचा फायदा हा राज्यातील सर्व शासकीय/अशासकीय महाविद्यालयांतील विध्यार्थी व शिक्षक यांना होण्याच्या दृष्टीने, तसेच विभागांतर्गत महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था, पुणे आणि शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, रत्नागिरी व शासकीय विज्ञान संस्था, नागपूर या संस्थाना Infosys कंपनीकडून उचित सहकार्य मिळण्याच्या दृष्टीने संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई व संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे आणि Infosys कंपनी मध्ये एक महत्वपूर्ण "त्री पक्षीय सामजस्य करार" (MoU) करण्यात आलेला आहे.

संस्थांकडून प्राप्त माहितीच्या आधारे विद्यार्थी / शिक्षक यांची नोंदणी प्रक्रिया निरंतरपणे चालू आहे. ज्या संस्थांनी आतापर्यंत माहिती दिलेली / अपलोड केलेली नसेल त्यांनी अपलोड करावी. ज्या संस्थांनी दिलेल्या माहितीत त्रुटी असतील, त्यांनी अचूक माहिती अपलोड करावी. संस्थानिहाय नोंदणी केलेल्या इमेल / युजर्स ची यादी तसेच नोंदणी न झालेल्या इमेल ची यादी आपणास पाठविलेली आहे. तसेच संस्थांना त्यांचे लॉगीन मध्ये सुद्धा उपलब्ध आहे.

आजपर्यंत ११४१ संस्थांमधील ६,१४,६४९ विद्यार्थी / शिक्षक यांची नोंदणी झालेली असून त्यापैकी फक्त ३२,६४४ युजर्स यांनी लॉगीन केलेले आहे. तरी सर्व संस्थांना याबाबत सूचित करण्यात येते की, User नी Login करावे.

पुढील टप्प्यात संस्थांना डॅशबोर्ड उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. त्याकरिता प्रत्येक संस्थेने Single Point of Contact(SPOC) ई-मेल आयडी पाठवावयाचा आहे. ज्याचे मॅपिंग संस्थेसोबत करण्यात येईल. सदर ई-मेल आयडी हा **व्यक्तिगत नसावा** जेणेकरून संबंधित व्यक्ती बदलल्यास पुन्हा नवीन इमेल चे मॅपिंग करावे लागणार नाही. या अनुषंगाने संस्थेने स्प्रिंगबोर्ड करिता ई-मेल आयडी बाबत खालील प्रमाणे पद्धती सूचित करण्यात येत आहे.

| First Name | Last Name | Email ID |
| --- | --- | --- |
| SPOC DTE MH | 1002-GOVERNMENT COLLEGE OF ENGINEERING, AMRAVATI | **mh.dte.1002**@<valid domain name> or **principal**@abcdcollege.com or **placementofficer**@abcdcollege.com or **nodal.officer**@abcdcollege.com |

टीप : <valid domain name> हा संस्थेचा अथवा इतर सेवा पुरवठादाराचा (gmail, yahoo, rediffmail, etc) असू शकतो. आवश्यकता असल्यास mh.dte.1002@<valid domain name> प्रमाणे तयार करण्यात यावा उदा. **mh.dte.1002@gmail.com** .

तरी सर्व इन्स्टिटयूट नोडल अधिकारी यांनी त्यांच्या संस्थांची **SPOC mail id** माहिती खाली दिलेल्या Google Form मध्ये दिनांक ०७.०४.२०२२ पर्यंत देण्याचे करावे. जेणे करून intosys कडून त्यांचे मॅपिंग करून घेता येईल व त्यांना त्यांचे संस्थेबाबतची माहिती उपलब्ध होईल तसेच संस्थेची मायक्रो साईट तयार करता येईल.

सोबत : Google Form Link - https://forms.gle/xrreucfLTCUhhRaw7

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.